**<u>रे.दि.मु.नं.३८/२०१४ मधील नि.क्र.११३ वरील आदेश</u>**
**(<u>घोषित दि.२९.०३.२०२३</u>).**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी याने दाखल केला असून, प्रतिवादी यांनी वाद मिळकतीमधून उसाचे पिक घेवून जाणेस हरकत अडथळा करू नये म्हणून ताकिदीची मागणी वादीने सदरच्या अर्जात केली आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.११६ वर दाखल करून वादीचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे, दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव आणि मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत गट नंबर ११४० याचा ताबा आणि मालकी वादीला “मुंबई तुकडे बंदी तुकडे जोड” कायद्याच्या तरतुदींप्रमाणे प्राप्त झालेला आहे. प्रतिवादी हे वादीचा ताबा नाकारून त्यास हरकत अडथळा करत आहेत. दाव्यात वादी यांनी नि.क्र ५ चा अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज या कोर्टाने मंजूर केलेला आहे. सदरचा अर्ज मंजूर करताना न्यायालयाने वादीची न्याय बाजू विचारात घेतली होती. प्रतिवादी याने सदर अर्जाच्या निकालावर मा.वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करून एकत्रीकरणाच्या योजणेमध्ये आवश्यक त्या तरतुदींचे पालन केले नसल्याबाबत मा. वरिष्ठ न्ययालयात युक्तीवाद केला आणि तो विचारात घेवून मा. वरिष्ठ न्यायालयाने वादीच्या लाभातील मनाई हुकूमाचा आदेश रद्द केलेला आहे. वादीचे असेही कथन आहे की, सन १९६६–६७ पासून वादीचा दावा मिळकतीमध्ये ताबा आहे. मा.वरिष्ठ न्यायालयाने वादीच्या ताब्याबाबत कुठलेली भाष्य

केलेले नाही. वाद मिळकतीमध्ये वादीने उसाची लागण केली आहे. सदरचा उस हा साखर कारखान्यासाठी पाठवायचा आहे. परंतु, प्रतिवादी यांच्या लाभात मा.वरिष्ठ न्यायालयाने निकाल दिल्याने प्रतिवादी हे सदरचे उसाचे पिक तोडण्यास हरकत अडथळा करत आहे. त्याकरीता, प्रतिवादी यांनी संबंधीत कारखान्याला लेखी अर्ज दिला आहे. दिनांक १५.०३.२०२३ पर्यंत सदर कारखान्यात उसाचे गाळप होणार आहे. करीता, प्रतिवादी यांनी वाद मिळकतीमधील उसाची तोड करण्यास हरकत अडथळा करू नये म्हणून प्रतिवादीविरूध्द ताकीद हुकूम मिळण्याकरीता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणण्यात कथन केले आहे की, वादीचा सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे, वादीच्या मागणीप्रमाणे प्रस्तुतच्या अर्जावर न्यायनिवाडा करण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. मा.जिल्हा न्यायालय यांचेकडील अपिल क्रमांक ९४/२०१५ यावर दिनांक ३०.०३.२०२२ रोजी निकाल झाला असून, सदर निकालामध्ये दावा मिळकतीमध्ये वादीचा मालकी हक्क अगर वहिवाट नाही असे अनुमान काढून वादीचा नि.क्र.५ चा अर्ज व त्यावरील आदेश मा.जिल्हा न्यायालयाने फेटाळलेला आहे. त्यामुळे, त्याच कारणासाठी वादीला सदर न्यायालयासमोर दाद मागण्याचा कुठलाही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादीने पुढे असेही कथन केलेले आहे की, वादींनी मा.जिल्हा न्यायालयाच्या आदेशाच्या विरूध्द मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे दाद मागणे आवश्यक होते. वादीने मा. उच्च न्यायालयात तसे रिट पिटीशन दाखल केले आहे ते मा. न्यायालयापुढे प्रलंबीत आहे. अशा परिस्थितीत, वादीला प्रतिवादीविरूध्द या न्यायालयासमोर ताकिद मागणेसाठी हक्क व अधिकार नाही.

५. प्रतिवादीने त्याच्या लेखी म्हणण्यात पुढे असेही कथन केलेले आहे की,

वादींना वाद मिळकतीतील मालकी हक्क व ताबा हा एकत्रीकरणाच्यावेळी झालेल्या त्रुटींमुळे मिळालेला आहे. त्याअनुषंगाने झालेले सर्व रेकॉर्ड व फेरफार हे बेकायदेशीर आहेत आणि त्याचा योग्यतो अर्थ मा. जिल्हा न्यायालयाने आपल्या आदेशात लावलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता यामध्ये जर कोणता आदेश अथवा मागणी मिळविण्यासाठी स्पष्ठ अशी तरतुद नसेलतर सदर संहितेमधील कलम १५१ याचा आधार मा. न्यायालय घेवू शकते. प्रस्तुत प्रकरणात वादीने प्रतिवादीविरूध्द तुर्तातुर्त ताकिद मनाई हुकूम मागितला होता. त्यावर मा. जिल्हा न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून वादींच्या लाभातील मनाई हुकूमाचा आदेश रद्द बातल ठरविलेला आहे. अशा परिस्थितीत दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ चा आधार वादीला घेता येणार नाही. करिता, वादीचा सदरचा अर्ज हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

**६**. वादीचा अर्ज आणि प्रतिवादीचे म्हणणे, दोन्ही बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे आणि प्रतिज्ञापत्र विचारात घेता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरूध्द जाहीर ठराव आणि निरंतर ताकिद यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनाप्रमाणे वादीने कथन केलेले आहे की, दावा मिळकतीचे जुने सर्वे नंबर २८०/१, २८०/२ आणि २८०/३ हे मुळचे प्रतिवादीचा भाउ नानासो पिसाळ यांच्या मालकीचे होते. नानासो पिसाळ यांनी सन १९६१ साली अर्ज दिल्यावरून सर्वे नंबर २८०/२ आणि २८०/३ हे त्यांची पत्नी सुलोचना यांच्या नावावर करण्यात आले. पुढे एकत्रीकरणाच्या योजणेमध्ये जुना सर्वे नंबर २८०/२ याचा नवीन गट नंबर २८०/३ब तर जुना सर्वे नंबर २८०/३ याचा नवीन गट नंबर २८०/३क असा करण्यात आला. वादीने पुढे दाव्यात असेही कथन केलेले आहे की, खरेदीखत करतेवेळी जुना सर्वे नंबर २८०/३ हा प्रत्यक्षात प्रतिवादी यांच्या वहिवाटीत होता. जुना सर्वे नंबर २८०/१ यावर प्रतिवादीचे

पोकळीस्त नांव नोंदविले होते. कारण, सदरची जमिन ही चढ–उताराची, तांबट व चुनखडी स्वरूपाची होती. त्यामुळे, प्रतिवादीने त्याचा ताबा जुना सर्वे नंबर २८०/३ मध्येच कायम ठेवली. त्यामुळे, प्रतिवादीचे जुना सर्वे नंबर २८०/१ याच्याशी कुठलाही हक्क संबंध नव्हता. पुढे, सन १९६७–६८ साली ओझर्डे येथे गट योजना लागू झाली. वादीचे असलेल्या सर्वे नंबर २८०/१ व २८०/२ मधील प्रत्यक्ष वहिवाट लक्षात घेवून व आवश्यक ती चौकशी करून सर्वे नंबर २८०/१ व जुना सर्वे नंबर २८०/३ एकत्र करून त्याचा गट नंबर ११४० असा करण्यात आला. वादीच्या नावाने ट्रान्स्फर सर्टीफिकेट व नकाशे तयार करण्यात आले. त्यास कोणीही आक्षेप घेतलेला नाही. वादीने पुढे असेही कथन केलेले आहे की, सदर शेतजमिन वहिवाटीस घेतल्यानंतर त्याचे सपाटीकरण करून ती लागवडी योग्य केली आणि त्यासाठी रूपये दहा लाख एवढा खर्च केला. परंतु, प्रतिवादी हा फेरनंबर ६०६७ याबाबत हरकत उपस्थितीत करत आहे आणि त्याने त्याबाबत अपिल देखील दाखल केलेले आहे. प्रतिवादी हा वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहे. करिता, वादीने सदरचा दावा दाखल केलेला आहे.

**७**. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील नि.क्र.५ वरील आदेश मा. जिल्हा न्यायालयाने किरकोळ अपिल क्रमांक ९४/२०१५ च्या दिनांक ३०.०३.२०२२ रोजीच्या निकालाप्रमाणे वरील आदेश रद्द बातल ठरविलेला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे मा. जिल्हा न्यायालय यांच्या न्यायनिर्णयाप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादी यास मालकी व ताबा नाही असे निष्कर्श नोंदविण्यात आलेले आहेत व त्याप्रमाणे आदेश पारित झालेला आहे. करिता, सदरच्या निकालाबाबत या न्यायालयास भाष्य करण्याचे कुठलेही अधिकार क्षेत्र नाही. प्रतिवादी यांनी कथन केल्याप्रमाणे वादींनी मा.जिल्हा न्यायालयाच्या सन २०२२ मधील न्यायनिर्णयाविरूध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे रिट पिटीशन दाखल करून

दाद मागितली आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज देखील मा.उच्च न्यायालय यांच्याकडे दाखल करणे संयुक्तीक होणार आहे. तसेच, मा. उच्च न्यायालय यांनी मा. जिल्हा न्यायालय यांचा आदेश स्थगित करून रद्द केलेला आहे याबाबतही वादी विधीज्ञांनी कुठलाही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच, प्रतिवादी यांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे या न्यायालयास प्रतिवादींविरूध्द पुन्हा नव्याने कलम १५१ चा आधार घेवून प्रतिबंधात्मक आदेश पारित करता येवू शकत नाहीत. सदरच्या युक्तीवादाकामी प्रतिवादी यांनी खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतलेला आहे.

अ. *अब्दुल रहिम बी. अतार आणि इतर वि. अतूल अंबालाल बरोट आणि इतर*
ए.आय.आर.२००५ मुंबई पान नंबर १२०

ब. *बंजेरलोबा आणि इतर वि. जे. वाल्टर लोगचर आणि इतर* ए.आय.आर.२०२१ गुवाहाटी
पान नंबर १११

क. *नॅशनल इंन्स्टीट्यूट ऑफ मेंटल हेल्थ आणि न्युरो सायन्सेस वि. सी. परमेश्वरा*
ए.आय.आर.२००५ सुप्रीम कोर्ट, पान नंबर २४२.

ड. *सुनिल काक्रानिया आणि इतर वि. मे.सालटी इंन्फ्रास्टक्चर लि. आणि इतर*
ए.आय.आर.२००९ कलकत्ता, पान नंबर २६०.

इ. *सी.ई.एस.सी. मर्यादित वि. एस.के. सलाउद्दीन* ए.आय.आर. २००९(एन.ओ.सी)
पान नंबर १४५९ कलकत्ता.

ई. *मनोहर लाल चोप्रा वि. राय बहाद्दूर राव राजा शेठ हिरालाल* १९६२ ए.आय.आर.
पान नंबर ५२७. सुप्रिम कोर्ट.

८. वरील न्यायनिर्णयांचे मी बारकाईने वाचन केले. सदर न्यायनिर्णयांमध्ये मा. सर्वेच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय यांनी निर्देशित केल्याप्रमाणे जेव्हा केव्हा एखाद्या व्यक्तीला दाद मागणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेत स्पष्ट अशी तरतुद नमुद नसेल

तेव्हाच कलम १५१ चा आधार घेवून न्यायालयाला न्यायनिवाडा करताना आधार घेवून आदेश पारित करता येवू शकतो. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी वादीविरूध्द तुर्तातुर्त ताकिद हुकूमाची मागणी केली होती ती प्रथम मान्य करण्यात आली होती आणि त्यानंतर मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाने ती रद्द बातल ठरविण्यात आली आहे. त्यामुळे, प्रस्तुतच्या प्रकरणात कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी याला वादीच्या कथनाप्रमाणे ऊस तोडण्यासाठी प्रतिबंधीत केले जावू शकत नाही. तसे केल्यास मा. जिल्हा न्यायालयाच्या आदेशाच्या विपरीत आदेश पारित केल्यासारखे होईल ते कायद्याला धरून नाही.

९. करिता, वर सविस्तरपणे कथन केल्याप्रमाणे वादीने दाखल केलेला सदरचा अर्ज हा आहे त्या स्वरूपात विचारात घेतला जावू शकत नाही. म्हणून, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. वादीचा निशाणी क्र.११३ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाहीत.

SHASHIKANT SURESH NICHAL

Digitally signed by SHASHIKANT SURESH NICHAL
Date: 2023.04.01 13:13:37 +0530

(एस. एस. निचळ)

दि.२९.०३.२०२३. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,वाई